# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. १८ सप्टेंबर २०२२

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७९३/२०२२ भादविसक ४०८,४०९,४२०,४६७,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०४/०२/२०२२ रोजी सह.दुय्यम निबंधक (वर्ग २) सोलापूर उत्तर कार्यालय, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. १८/०९/२०२२ रोजी १२.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दिनकर उध्दव इंगळे, वय- ५६ वर्षे, व्यवसाय- वरीष्ठ श्रेणी लिपीक, सोलापूर महानगर पालिका, सोलापूर, रा. आदित्य नगर, ए-६६५/६६, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शेरदी आय के, वय- ५५ वर्षे, (भुमी व मालमत्ता विभाग, अधिक्षक), रा. चिराग अली तकिया मंगल कार्यालयाजवळ, सोलापूर, २) बलराम नरोटे, (वरीष्ठ मुख्य लेखनिक), ३) कावळे राजकुमार लालबा, वय- ४६ वर्षे, (भुमापक), रा. सध्या- बाळे, मुळ गाव- लातुर |
| **हकिकत** | | यात हकिकत अशी की, पार्क चौक ते सिध्देश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेकडील रोड साईडची अंदाजे १९५६ चौ.फुट किंवा १८१.७१ चौ.मी सिटी सर्वे नं ८३७९ मध्ये येते व जी सोलापूर महानगर पालिकेच्या मालकीची आहे ती जागा इंडो तिबेटियन उलन मार्केट असोसीएशनला कालावधी नमुद करुन वेळोवेळी दिलेली आहे. वरील कार्यालयात दस्त नोंदणी क्रं. ६०८ वर नोंदणी केलेला दस्त दाखला सदरच्या दस्तामध्ये भाडयाने देण्याच्या मिळतीची मोजमापे जी १९५६ चौ.फुट किंवा १८१.७१ चौ.मी असताना त्यामध्ये केवळ १०५४ चौ.फुट किंवा ९०.१४ चौ.मी नमुद केल्याचे दिसुन आले. सदर भाडेपट्टा करारपत्र करण्याचा आरोपीत क्रं. २ यांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता परंतु सदर भाडेपट्टा नोंदविताना त्यांना अधिक्षक भुमी व मालमत्ता विभागाचे आरोपीत क्रं. १ यांनी त्यांचे जावक क्रमांकान्वये आरोपीत क्रं. २ यांना भाडेपट्टा करार नोदणीच्या दस्तावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार दिले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सदर बाबतचे रेकॉर्ड तपासल्यानंतर त्या अधिकार दिलेल्या पत्रावर भुमापक आरोपीत क्रं. ३ यांनी प्रस्ताव सादर केल्याचे स्पष्ट झाले. वास्तविकवरील आरोपीतांनी महानगर पालिकेच्या मालकीच्या जागेच्या संदर्भात भाडेपट्टा करणे बाबतचे नियमाची व तरतुदीची पुर्णपणे जाणीव होती व आहे. असे असतानाही त्यांनी त्या तरतुदीचे व नियमांचे जाणीवपुर्वक पालन न करता व भाडेपट्टा करार करण्याचे कोणतेही अधिकार नसताना सदरचा भाडेपट्टा केला. वास्तविक सदर जागेच्या मागील बाजुच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन या करीता दिलेल्या जागेच्या संदर्भात जाणे येण्याकरीता काही जागेची आवश्यकता महानगर पालिकेस होती व याची माहिती व कल्पना त्यांना होती. त्यामुळे इंडो तिबेटियन उलन असोसीएशन बरोबर कोणताही करार करायचा नाही याची वरील आरोपीतांना महिती असताना संगणमताने व एक दिलाने त्यांना अधिकार नसताना सदर जागेच्या संदर्भात भाडेपट्टा करारपत्र करुन दिले. तसेच जागेची मोजमापे हि जाणीवपुर्वक चुकीची व जवळजवळ ९०० चौ. फुटाचे कमी नमुद करुन महापालिकेचे जवळजवळ दरवर्षी १ लक्ष इतके आर्थिक नुसान केले आहे. केलेला करार पुर्णपणे मुलतः अवैध आणि बेकारयदेशीर आहे. वरील आरोपीतांना याची पुर्णपणे जाणीव, कल्पना होती व आहे. त्यामुळे वरील आरोपीतांनी महापालिकेची व इंडो तिबेटियन उलन असोसीएशन यांची संगनमताने फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- पोसई/ बेंबडे- **८६५७७७३४२२** |